## निशणी क्र.२४ वर आदेश

**१.** वादीने सदर अर्ज त्याचे दाव्यात दुरूस्तीसाठी केला आहे. प्रतिवादीने सदर अर्जावर त्याचे म्हणणे दिलेले आहे. अर्ज व म्हणणे वाचले, युक्तीवाद ऐकला.

**२.** खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे:-

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दाव्यातील प्रस्तावित दुरूस्तीस परवानगी देणे योग्य आहे का? | होय. |
| २. | आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्र.१ व २:-**

**३.** वादीने वाद मिळकतीबाबत मालकी घोषीत करुन उद्घोषणा व ताबा मिळणेकरीता दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये परिच्छेद क्र. ३ मधील ९ नंबरच्या लाईनमध्ये खरेदीखत क्र. २१८१/९४ असा आहे, परंतु तो २१८२/९४ असा पाहिजे होता, तसेच विनंती मधील पॅरा क्र. ८ ब मध्ये २१८२/९४ असा उल्लेख पाहिजे होता त्याअनुषंगे दुरुस्ती अर्जाव्दारे विनंती केली आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे नुकसान होणार नाही त्यामुळे दुरुस्तीस परवानगी मिळणे आवश्यक आहे. तर, प्रतिवादीने त्याचे म्हणण्याव्दारे अर्जास तीव्र विरोध दर्शवून अर्ज कायदेशीर नाही असे म्हणणे मांडून खर्चाची मागणी केलेली आहे.

**४.** दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ हा दाव्यातील पक्षकाराना त्यांचा दावा किंवा कैफियत न्यायालय ठरवेल त्यानुसार परवानगीची संधी देणे असा आहे. दुस-या बाजुचे अपरिमीत नुकसान होत नसेल किंवा त्यांच्यावर गंभीर अन्याय होत नसेल तर दुरूस्ती मान्य करायला न्यायालयास मुभा आहे जर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात काही बदल होणार

नसेल तर दुरूस्ती मान्य करता येते.

५. प्रकरणात वादीच्या पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. २० वर दाखल केले असुन प्रकरण उलटतपासासाठी प्रलंबित आहे. वादी मागीत असलेल्या दुरुस्ती अथवा समाविष्ठ करू इच्छित असलेला मजकुर ही दावा मिळकतीच्या संदर्भातील काही तथ्य असल्याचे दिसुन येते. वादी हा प्रस्तावित दुरुस्ती अन्वये वादपत्रामध्ये खरेदीखताचा क्रमांक नजर चुकीने टंकलिखित झाल्याचे कथनकरुन सदर चुकीची दुरुस्तीची मागणी करीत आहे. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे. अभिलेखावर कागदपत्राची यादी नि.क्र. ४ सोबत दिनांक २०/१२/१९९४ रोजीचे खेरदीखताचा दस्त दाखल असुन त्याचा क्रमांक २१८२/१९९४ असा आहे. सदरचे खरेदीखत हे प्रतिवादीच्या हक्कात नोंदणी केलेले आहे व प्रतिवादी क्र. १ ला सदर दस्ताबातची वस्तुस्थिती ज्ञात आहे. त्यामुळे सदर दुरुस्तीमुळे आश्चर्यजनक अशी बाब अचानपणे अभिलेखावर येत नाही. प्रकरणात वादी साक्षीदाराचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असले तरी त्यावर उलटतपास होणे बाकी आहे. सदर प्रकरण हे सकारात्मरित्या पुराव्यास लागलेले आहे असे म्हणता येणार नाही. प्रतिवादीस दावा दुरुस्तीनंतर त्याचे दुरुस्तीच्या अनुषंगे कैफियत देण्याची संधी मिळणार आहे. अर्जातील प्रस्तुत दुरुस्तीच्या अनुषंगेचा मजकुर हा घटनेचा तथ्य असल्याने वादीस त्याचे पूर्ण कथन अभिलेखावर आणण्यासाठी दाव्यात दुरुस्तीची परवानगी देणे योग्य ठरणार आहे. सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही आमुलाग्र असा बदल होत नाही अथवा प्रतिवादीचे अपरिमीत असे हानी होईल असेही दिसून येत नाही. या ठिकाणी हे नमुद करावे लागेल की, प्रस्तावीत दुरुस्तीच्या अनुषंगे वादीने विलंब केलेला आहे. मात्र, सदरच्या विलंबामुळे प्रतिवादीचे झालेले नुकसान हे खर्चाच्या स्वरूपात भरून काढता येईल. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. २ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## **आ दे श**

१. वादीचा नि.२४ वरील अर्ज रुपये ५००/- खर्च प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादीस दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. सदरची दुरुस्ती वादीने विहित मुदतीत करावी व दुरुस्त प्रत सादर करावी.

SHARAD NARAYAN GAVALI
Digitally signed by SHARAD NARAYAN GAVALI

दिनांकः- ३०.१०.२०२३

**(शरद ना. गवळी)**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same word to word, as per the original **Order.**

| | | |
|---|---|---|
| Name of the Jr Clerk | : | **Rohan S. Koshti** |
| Name of court | : | Jt.C.J.J.D.& JMFC, Risod. |
| Date | : | 30.10.2023 |
| Order signed by the Presiding Officer | : | 30.10.2023 |
| **Order uploaded on** | **:** | **31.10.2023** |